पत्र क्र.अल्पसंख्यांक/अ.का./कावि - 6 /2017
जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला
दिनांक 16.11.2017

महाराष्ट्र शासन

# अल्पसंख्यांक विकास विभाग

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग

## प्रशिक्षणार्थींची निवड करण्यासाठी जाहिर सुचना

वर्ष 2017-18 मध्ये पोलीस शिपाई भरती पुर्व परिक्षा प्रशिक्षण योजने अंतर्गत राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, पारसी,जैन आणि ज्यु या अल्पसंख्यांक समाजातील इच्छुक उमेदवारांना शासनामार्फत विनामुल्य पोलीस शिपाई भरती पुर्व परीक्षा प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

अल्पसंख्यांक समाजातील उमेदवारांकडुन प्रशिक्षणासाठी अर्ज मागविण्यात येत असुन या संदर्भातील निवड चाचणीसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### उमेदवारांच्या निवडीसाठी अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील

1. प्रशिक्षणार्थींचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु.2.50 लक्ष (अक्षरी दोन लक्ष पन्नास हजार) फक्त पेक्षा जास्त नसल्याचा पुरावा.
2. उमेदवार अल्पसंख्यांक (मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, पारसी,जैन आणि ज्यु) समाजातील असावा.
3. उमेदवार हा 18 ते 28 या वयोगटातील असावा.
4. उमेदवारांची उंची पुरुष 165 से.मी. व महिला 155 से.मी., छाती पुरुष 79 से.मी. (फुगवुन 84 से.मी.) असावी.
5. उमेदवार इयत्ता 12 वी उत्तीर्ण असावा.
6. उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, आधार कार्ड इ. कागदपत्रांच्या सत्यप्रती अर्जासोबत देणे आवश्यक राहील.
7. उमेदवार शारीरीकदृष्टया निरोगी व सक्षम असावा.

### प्रशिक्षणाचे स्वरुप

1. निवडलेल्या उमेदवारांना एकुण दोन महिने (50 दिवस) प्रशिक्षण दिले जाईल. या दरम्यान दररोज तीन तासांचे वर्ग प्रशिक्षण व दोन तासांचे मैदान प्रशिक्षण देण्यात येईल.
2. निवडलेल्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीस प्रशिक्षणा दरम्यान रु.1500/- (अक्षरी एक हजार पाचशे फक्त) प्रतिमाह प्रमाणे विदयावेतन देण्यात येईल.
3. निवडलेल्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीस प्रशिक्षण दरम्यान मैदानी प्रशिक्षणानंतर प्रशिक्षण संस्थेमार्फत चहापान व अल्पोपहार देण्यात येईल.
4. निवडलेल्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीस गणवेश साहित्यासाठी (गणवेश, बुट, मोजे, बनियान इ.) रु.1000/- (अक्षरी एक हजार) एवढे एकरकमी अनुदान देण्यात येईल.
5. निवडलेल्या प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षणा दरम्यान निवासाची व्यवस्था स्वतः करावी लागेल.

**इच्छुक उमेदवारांनी दिनांक 21 नोव्हेंबर 2017 रोजी सकाळी 11.00 ते सायं. 5.00 वाजेपर्यंत खाली नमुद केलेल्या ठिकाणी अर्ज आणि सर्व कागदपत्रांच्या छायाप्रतींसह उपस्थित रहावे.**

**ठिकाण : पोलीस मुख्यालय मैदान, लक्झरी बस स्टॅन्ड जवळ, अकोला**

**(श्रीकांत देशपांडे)**
**निवासी उपजिल्हाधिकारी, अकोला**

**प्रति,**

जिल्हा माहिती व सूचना विज्ञान अधिकारी, अकोला यांना माहिती व सदर प्रशिक्षणाबाबतची जाहिरात तसेच अटी व शर्ती अकोला जिल्हयाच्या संकेतस्थळावर www.akolanic.in प्रसिध्द करण्यात यावे.